# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मुख्य लेखापरिक्षण यांचे कार्यालय

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) ता. जि. ठाणे – ४०१ १०१

माहितीचा अधिकार

जा.क्र.मनपा/मा.अ./ 06 /2021-22 दि. ४ / ६ /2021

प्रति
जनमाहिती अधिकारी तथा
सहा.आयुक्त (सा.प्र)
मिरा भाईंदर महानगरपालिका

**विषय:- श्री. राजीव देशपांडे यांनी दि.05/11/2018 रोजी दिलेल्या परिपत्रकेनुसार केलेल्या कार्यवाहीबाबतची माहिती मिळणेबाबत.**

**संदर्भ:- सा.प्र/मनपा/87/2021-22 दि.19/05/2021 रोजीचे पत्र**

महोदय,

माहिती अधिकार अधिनियम-2005 अंतर्गत श्री. राजीव देशपांडे यांनी उपायुक्त (मु) यांनी दि.05/11/2018 रोजी नागरीकांच्या तक्रारीवर वेळेत कार्यवाही करणेबाबत निर्गमित केलेल्या परिपत्रकाच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीबाबत माहिती अपेक्षिलेली आहे.

सदर परिपत्रकाच्या अनुषंगाने या विभागात प्राप्त होणा-या तक्रारीबाबत मुदतीत कार्यवाही केली जाते. त्यामुळे सद्यस्थितीत कोणतीही प्रकरणे प्रलंबित नाहीत.

तरी सदर माहीती आपल्या स्तरावरुन अर्जदारास परस्पर उपलब्ध करुन द्यावी ही विनंती.

(चारुशिला खरपडे)
जनमाहिती अधिकारी तथा
सहा.लेखापरीक्षक
मिरा भाईंदर महानगरपालिका

06/04/27
आ-4

प्रत.
श्री राजीव देशपांडे
बी/15, नुतन निवास,वीर सावरकर नगर,
वसई रोड (पश्चिम), वसई 401202
जि.पालघर

2-6-2021

y 160 दि. 2015

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.),
ता. जि. ठाणे - ४०१ १०१, दुरध्वनी क्र. : २८१९ २८२८.

## || सामान्य प्रशासन विभाग ||

जा.क्र.मनपा/सा.प्र./ ८८ /२०२१ - २२ दि. ३० / ०५ /२०२१

प्रति,
जनमाहिती अधिकारी तथा
सर्व विभागप्रमुख/ खातेप्रमुख/ प्रभाग अधिकारी,
मिरा भाईंदर महानगरपालिका

...ण विभाग
०४
20/5/2021

विषय :- केंद्र शासनाचा माहिती अधिकार अधिनियम, 2005 अंतर्गत माहीती मिळण्याबाबत.
संदर्भ :- 1. सा.प्रशासन विभाग, जा.क्र.मनपा/सा.प्र./639/2018, दि. 5/11/2018 रोजीचे परिपत्रक
2. श्री. राजीव त्रिंबक देशपांडे यांच्याकडील दि.14/05/2021 रोजीचा अर्ज

विषयंकित प्रकरणी संदर्भिय पत्राच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, संदर्भिय पत्रातील विषय दि. 5/11/2018 रोजीचे परिपत्रक (सा.प्रशासन विभाग, जा.क्र.मनपा/सा.प्र./639/2018) नुसार मुद्दा क्र. अ, ब व क हे आपल्या विभागाशी संबंधित असल्यामुळे माहिती अधिकार अधिनियम, 2005 मधील कलम 6 (3) अन्वये संदर्भिय पत्र पुढील कार्यवाहीसाठी आपल्या विभागास वर्ग करण्यात येत आहे. संबंधितांस परस्पर माहीती देण्यात यावी, व त्यांची एक प्रत सामान्य प्रशासन विभागांकडे देण्यात यावी.

सोबत :- संदर्भिय पत्र व परिपत्रक जोडले आहे.

(अविनाश जाधव)
जनमाहिती अधिकारी तथा
सहा. आयुक्त (सा.प्र.)
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत माहितीस्तव :-
श्री. राजीव त्रिंबक देशपांडे
बी-15, नूतन निवास,
वीर सावकार नगर,
वसई रोड, वसई-401202
मोबाईल नं-9175987902

# मिरा भाईंदर महानगरपालिका

सामान्य प्रशासन विभाग
जा.क्र.मनपा/सा.प्र./६३९/२०१८
दि. ०५ /११/२०१८

-:परिपत्रक:-

मिरा भाईंदर महानगरपालिकेतील कामाच्या संदर्भात नागरिकांच्या तक्रारी या प्रत्यक्ष पत्राद्वारे व ई-मेलद्वारे प्राप्त होत असतात. अशा तक्रारीचे त्वरित निराकरण करुन त्याबाबतची माहिती संबंधितास कळविणे अपेक्षित आहे. परंतु अशा तक्रारींचे निराकरण वेळेत होत नसल्याचे माझे निदर्शनास आलेले आहे. तसेच तक्रारींचे निराकरण वेळेत करुन देखील त्याबाबतची माहिती संबंधित तक्रारदारास कळविली जात नाही.

तरी, आपणाकडे आलेल्या व येणाऱ्या सर्व तक्रारींचे योग्य ते निराकरण करुन त्याबाबतची माहिती संबंधितास त्वरित कळविण्याची दक्षता घेण्यात यावी.

(विजयकुमार म्हसाळ)
उपायुक्त (मुख्यालय)
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत :-

१) विभागप्रमुख/खातेप्रमुख (सर्व)
२) प्रभाग अधिकारी (सर्व)

केंद्रशासनाच्या माहिती ...विण्याचा अधिकार २००५ कलम - ५

जोडपत्र (अ)

माहिती मिळविण्याकरीता करावयाच्या अर्जाचा नमुना

प्रति.

मा. जनमाहिती अधिकारी,
उपायुक्त (मु.),
मिराभाईंदर महानगरपालिका,
भाईंदर (प.), जि :- ठाणे - ४०११०१

१. अर्जदाराचे नाव : गजानन त्रिंबक देशपांडे

२. पत्ता : बी/१५, नुतन निवास, वीर सावरकर नगर, वसई रोड (पश्चिम), वसई ४०१२०२ जि. पालघर

३. माहितीचा विषय :- दि. ०५-११-२०१८ रोजीचे परिपत्रक
(सा. प्रशासन विभाग, जा.क्र. मनपा/साप्र./६३९/२०१८)

४. माहितीशी संबंधीत कालावधी :- अर्ज निर्णय होईपर्यंत

५. माहितीचे वर्णन :- अ] वरील विषयांकीत परिपत्रकानुसार अमंलबजावणी करणाऱ्या अधिकारी, कर्मचाऱ्यांची जबाबदारी निश्चित करुन त्यांची नांवे, पदनाम, कार्यरत विभाग याबाबत साक्षांकीत माहिती पुरवीणे.

ब] वरील विषयांकीत परिपत्रकानुसार अमंलबजावणी न करणाऱ्या अधिकारी, कर्मचाऱ्यांविरोधात कारवाई करण्याच्या अधिनियम, नियम, शासन निर्णय, आदेश, परिपत्रक याबाबत साक्षांकीत माहिती पुरविणे

क] वरील विषयांकीत परिपत्रकाची अमंलबजावणी न करणाऱ्या अधिकारी, कर्मचाऱ्यांविरुद्ध केलेल्या कारवाईची साक्षांकीत माहिती पुरविणे.

६. माहिती टपालाद्वारे हवी की व्यक्तीशः :- व्यक्तिशः

दिनांक :- १२-५-२०२१

ठिकाण - भाईंदर

अर्जदाराची स्वाक्षरी